# मेट्रो ३ :१३ स्थानकांचे १०० टक्के खोदकाम

## उर्वरित १३ स्थानकांचे खोदकाम मेपर्यंत होणार पूर्ण

**। मुंबई : नियोजित वेळेत प्रकल्प पूर्ण करण्याच्या दिशेने एमएमआरसीएलने एक पाऊल पुढे टाकत १३ भुयारी स्थानकांचे १०० टक्के खोदकाम पूर्ण केले आहे. उर्वरित १३ स्थानकांचे खोदकाम मे २०२० पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. नव्या वर्षातील उद्दिष्टांपैकी प्राधान्याने खोदकाम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.**



खोदकाम पूर्ण झालेल्या स्थानकांमध्ये कफ परेड, विधान भवन, चर्चगेट, हुतात्मा चौक, सीएसएमटी, सायन्स म्युझियम, सिद्धिविनायक, एमआयडीसी, मरोळ नाका, सहार रोड, सीएसएमआयए- आंतरदेशीय, सीएसएमआयए - आंतरराष्ट्रीय विमानतळ व सीप्झ या स्थानकांचा समावेश आहे. याविषयी बोलताना संचालक (प्रकल्प) एस. के. गुप्ता म्हणाले की, सध्या सुरू असलेल्या स्थानकांच्या कामाला आणखी गती प्राप्त होईल. उर्वरित स्थानकांचे खोदकामदेखील युद्ध पातळीवर सुरू आहे व येत्या ३-४ महिन्यांत ते पूर्ण होईल. एकंदरीत ८७ टक्के खोदकाम पूर्ण झाले आहे.

**उर्वरित स्थानकांच्या खोदकामाचा तपशील पुढील प्रमाणे :**

१) काळबादेवी स्थानक - २६ टक्के
२) गिरगाव स्थानक - १४ टक्के
३) ग्रँट रोड स्थानक - ५६ टक्के
४) मुंबई सेंट्रल स्थानक - ७३ टक्के
५) महालक्ष्मी स्थानक - ७५
६) आचार्य अत्रे चौक स्थानक - ३९ टक्के
७) वरळी स्थानक - ८२ टक्के
८) दादर स्थानक - ८८ टक्के
९) शीतला देवी स्थानक - ७१ टक्के
१०) धारावी स्थानक - ८१ टक्के
११) बीकेसी स्थानक - ८३ टक्के
१२) विद्यानगरी स्थानक - ८७ टक्के
१३) सांताक्रुझ स्थानक - ९३ टक्के

# वडाळ्यातील मेट्रो स्टेशन उभारणीतील अडथळे अखेर दूर

**। मुंबई :** वडाळा येथील जीएसटी विभाग मुख्यालयाची इमारत व त्यालगत असणाऱ्या मेट्रो रेल्वे स्थानकाच्या उभारणीतील सर्व अडथळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी झालेल्या बैठकीत दूर करण्यात आले. दोन्ही प्रकल्पांचे काम निश्चित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

जीएसटी मुख्यालय इमारत आणि वडाळा मेट्रो स्थानकाच्या जमिनीसंदर्भातील काही मुद्द्यांमुळे प्रकल्प उभारणीत अडथळे येत होते. ते दूर करून शहर विकासाच्या कामाला गती देण्यासाठी मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. मेट्रोसह मुंबई शहरातील विकास प्रकल्पांच्या कामात खंड पडू नये, उलट कामांची गती वाढवण्यात यावी. प्रकल्प उभारताना ते पर्यावरणपूरक व्हावेत तसेच प्रकल्पांच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात यावे, आदी सूचना उपमुख्यमंत्र्यांनी या वेळी केल्या. जीएसटी मुख्यालयास कर्मचाऱ्यांसह दररोज किमान दहा हजार जण भेट देतील. त्यांच्या सोयीसाठी मेट्रो स्टेशनमधूनच स्वतंत्र मार्गिका उपलब्ध करण्याचा निर्णयही या वेळी घेण्यात आला.

उपमुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीला एमएमआरडीए आयुक्त आर. ए. राजीव, अतिरिक्त आयुक्त सोनिया सेठी, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मनोज सौनिक, राजीव जलोटा आदींसह वरिष्ठ शासकीय अधिकारी उपस्थित होते.